# प्रकरण चार

## एकात्मिक बालविकास विभाग

**4.634 जिल्हा परिषद योजने अंतर्गत इयत्ता 5 वी ते 12 वी पर्यंत शाळेत मुलींना दोनचाकी सायकल वाटपाबाबत.**

**पंचायत समिती मुरबाड, जिल्हा ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत मुरबाड अंतर्गत बाल विकास प्रकल्प-1 व बाल विकास प्रकल्प-2 या विभागाचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात खालील प्रमाणकान्वये 5 वी ते 12 पर्यंत शिक्षण घेत असलेल्या मुलींना दोन चाकी सायकल खरेदी रक्कम रूपये 9,84,550/- ची करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, मुरबाडने बाल विकास प्रकल्प 1 व 2 यांना 5 वी ते 12 वी पर्यंत शिक्षण घेत असलेल्या मुलींना दोन चाकी सायकल उपरोक्त प्रमाणकान्वये बाल विकास प्रकल्प क्रमांक 1 यांनी उपयोगिता प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल लेखापरीक्षण पडताळणीस दिसून आले नाही. सदरची योजना ही वैयक्तीक लाभाची योजना असून, शाळेत जाणा-या मुलींना त्यांचे बँक खात्यात पैसे जमा करुन स्वत: सायकल खरेदी करुन लाभ मिळालेबाबत सदर लाभार्थ्यींचे सायकलसह छायाचित्र संचिकेत दिसून आले नाही.

2) प्रमाणक क्रमांक 100, 101, 102 अन्वये एकुण 105 मुलींना सायकल वाटप करण्यात आले आहे.

परंतु, संचिकेत लाभार्थ्यांचे बँक पासबुकास छायांकित प्रती जोडल्याचे दिसून येते. सदर लाभार्थ्यांचे खात्यावर प्रत्यक्ष लाभ दिल्याचे व बँक खात्यात पैसे जमा झाल्याबाबत खात्री करता येत नाही. तसेच प्रमाणक क्रमांक 101 अन्वये 46 मुलींना लाभ देण्यात आला असून प्रत्यक्षात 35 मुलींनी सायकल खरेदी केल्याचे बिल सादर केले आहे. 11 मुलींनी सायकल खरेदीचे बिल सादर केलेले नाही. लाभार्थ्यींनी सायकल खरेदी केल्याबाबतचे छायांकीत फोटोसह सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेची दिसून येत नाही. तसेच 46 लाभार्थीपैकी 35 लाभार्थ्यी हे वेगवेगळया ठिकाणी राहत असतांना देखील एकाच दुकानदाराकडून सायकल खरेदीचे बिल सादर केलेले आहे. सदरच्या लाभार्थ्यांचे बँक पासबुकावर अनुदान जमा झाल्याबाबतचे बँक पासबुकाची छायांकीत प्रत लेखापरीक्षणास सादर करावी.

**4.635 एकात्मिक बाल विकास योजना केंद्र, डोळखांब अंतर्गत शाळेत जाणाऱ्या इयत्ता 5 वी ते 12 वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींना सायकल वाटप योजनेमधील अनियमितता.**

**पंचायत समिती शहापुर, जिल्हा ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,91,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) लाभार्थी अर्ज दोन प्रतीत घेऊन एक प्रत कार्यालायात ठेवणे आवश्यक आहे. मात्र 18 लाभार्थी अर्ज लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

2) तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी प्राप्त अर्जाचे तारखेसहित रजिस्टर ठेवणे आवश्यक असूनही असे रजिस्टर ठेवण्यात आलेले नाही. यास्तव विहित मुदतीत किती अर्ज एकात्मिक बाल विकास योजना केंद्र, डोळखांब कार्यालयास प्राप्त झाले होते, याची लेखापरीक्षणास खात्री करता येत नाही.

3) उपलब्ध असलेल्या काही अर्जासोबत शाळांनी दिलेले दाखले माहे मार्च 2017 व एप्रिल 2017 चे आहेत. म्हणजेच लाभार्थी प्रस्ताव परिपूर्ण नसतानाही जिल्हा कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर केलेले आहेत.

4) महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचे पत्र क्रमांक ठाजिप/मबाकवि योजना/ 101/2016-17, दिनांक 30/01/2017 नुसार एकात्मिक बाल विकास योजना केंद्र, डोळखांबचे 141 लाभार्थी निश्चित केलेले असून पत्रासोबतच्या विवरणपत्रानुसार लाभार्थी माहिती मागविण्यात आली आहे. या विवरणपत्रातील क्रमांक 8 गावापासून शाळेपर्यंत अंतर (किलोमीटर) नमूद करायचे आहे. मात्र एकात्मिक बाल विकास योजना केंद्र, डोळखांब कार्यालयाने सादर केलेल्या सदर माहितीमध्ये विवरणपत्रातील क्रमांक 8 गावापासून शाळेपर्यंत अंतर (किलोमीटर)

नमूद केलेले नाहीत. म्हणजेच योजनेचा मूळ उद्देश शाळा ते घर यामधील अंतर 2 किलोमीटर पेक्षा जास्त आहे किंवा कसे, याची खात्री कशाप्रकारे केली, याचा बोध होत नाही.

5) लाभार्थ्यांनी खरेदी केलेल्या खरेदीच्या पावतीवर विक्रेत्याने VAT क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. या उपरोक्तही बहुतांश लाभार्थ्यांनी खरेदी केलेल्या खरेदीच्या पावतीवर विक्रेत्याने VAT क्रमांक नमूद केलेला नाही. यामुळे शासनास विक्रेत्यास मिळणाऱ्या फायदयाच्या रक्कमेवरील VAT रकमे इतक्या रकमेचे शासनाचे नुकसान झालेले आहे. यास्तव अशा परिस्थितीत VAT रकमेची गणना करून तितकी रक्कम लाभार्थीस कमी प्रदान करून शासनखाती भरणा होणे आवश्यक आहे. तरी यानुसार VAT रकमेची गणना करून ती रक्कम लाभार्थ्यांकडून वसूल करून शासनखाती भरणा करून तसे अनुपालन सादर करावे.

6) तसेच लाभार्थ्यांनी खरेदी केलेल्या खरेदीच्या पावतीवर विक्रेत्याने सायकल कोणत्या कंपनीची आहे, ISI दर्जा प्राप्त झालेली आहे किंवा कसे? सायकलचा सीरिअल क्रमांक इत्यादी महत्त्वपूर्ण बाबी नमूद करणे गरजेचे आहे व या बाबीची पडताळणी तपासणी अधिकाऱ्यांनी करणे गरजेचे आहे. मात्र काही लाभार्थ्यांनी खरेदी केलेल्या खरेदीच्या पावतीवर या महत्त्वपूर्ण बाबी नमूद नसूनही तपासणी अधिकाऱ्यांनी कशी काय पडताळणी केली व अनुदान देण्यास शिफारस केली, याबाबत खुलासा व्हावा.

**4.636 भारतरत्न डॉ ए.बी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना**

**पंचायत समिती वसई, जिल्हा पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** भारतरत्न डॉ. ए.बी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना अंतर्गत अंगणवाडी केंद्राना 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 29,43,875/- अनुदान वर्ग करण्यात आलेले असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंगणवाडी केंद्रांना अनुदान वर्ग करण्यात आलेले असुन अंगणवाडी केंद्र खानिवडे, तेलपाडा यांचे लेखे तपासले असता कॅशबुक ठेवण्यात आलेले नाही. तरी आढावा घेवुन सर्व अंगणवाडी केंद्रांना कॅशबुक ठेवण्याचे सुचना देण्यात यावे.

2) महाराष्ट्र शासन, अदिवासी विभाग, शासन निर्णय क्रमांक आाशिवि 2015/प्र.क्र.78/कार्यासन 8, दिनांक 18/11/2015 मधील बाब क्रमांक 3.2 नुसार योजनेचे वेळोवेळी त्रयस्त संस्थेमार्फत मुल्यामापन करण्यात आल्याचे आढळुन आलेले नाही. त्यामुळे सदरची योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्याचे दिसुन येत नाही. तसेच सदर शासन आदेशातील बाब क्रमांक 3.3 नुसार योजनाचा कामाबाबत व फलनिष्पत्तीचा आढावा घेण्यात आलेला नाही.

3) महाराष्ट्र शासन, अदिवासी विभाग, शासन निर्णय क्रमांक आाशिवि 2015/प्र.क्र.78/कार्यासन 8 दिनांक 18/11/2015 नुसार योजनेचे स्वयंसेवी संस्था स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था इत्यादी मार्फत सामुदायीक संनियत्रण (Community Based Monitoring) करण्यात आलेले नसून. न करण्याचे प्रयोजन स्पष्ट होत नाही.

**4.637 एकात्मिक बालविकास प्रकल्प रोहा अंतर्गत अंगणवाडीना पुरवठा केलेल्या कच्चा कोरडा आहाराबाबत व देयकाबाबत.**

**पंचायत समिती रोहा, जिल्हा रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कच्चा कोरडा आहार पुरवठा केले बाबतची माहे 4/16, 5/16, 6/16, 7/16, 8/16 व 10/16 पुरवठादार यांनी सादर केलेल्या देयकातील, अंगणवाडी सेविकांनी कार्यालयाकडे सादर केलेल्या पुरवठा चलनाच्या आधारे कोणत्याही अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली नाहीत व देयकाची रक्कम अदा केली आहे.

2) अंगणवाडी सेविकांनी सादर केलेल्या पुरवठा चलनाच्या नोंदी कार्यालयीन नोंदवहीत घेण्यात आलेल्या नाहीत.

3) पुरवठा चलनावर बॅच क्रमांक नमुद नसल्याने पुरवठादाराने देयेकासोबत सादर केलेला गुणप्रत तपासणी अहवालात दर्शविल्याप्रमाणेच कच्चा कोरडा आहार पुरवठा केल्याबाबतची सत्त्यता लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

4) जननी महिला मंडळ, पुणे यांनी उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे वरील महिन्यातील देयकांवर पावती क्रमांक, चलन क्रमांक तसेच व्हॅट क्रमांक (विक्री कर) प्रमाणपत्र क्रमांक नमूद केलेला नाही. लेटर पॅडवर देयके सादर केल्याचे दिसून येत आहे. अशी देयके मंजूर कशाच्या आधारे केली? याचा खुलासा केलेला नाही.

**4.638 एकात्मिक बालविकास प्रकल्प म्हसळा अंतर्गत अंगणवाडीना पुरवठा केलेल्या कच्चा कोरडा आहाराबाबत व देयकाबाबत.**

**पंचायत समिती म्हसळा, जिल्हा रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 17) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कच्चा कोरडा आहार पुरवठा केले बाबतची माहे 3/16, 4/16, 6/16, 7/16, 10/16 व 11/16 पुरवठादार यांनी सादर केलेल्या देयेकातील, अंगणवाडी सेविकांनी कार्यालयाकडे सादर केलेल्या पुरवठा चलनाच्या आधारे कोणत्याही अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली नाहीत व देयकाची रक्कम अदा केली आहे.

2) अंगणवाडी सेविकांनी सादर केलेल्या पुरवठा चलनाच्या नोंदी कार्यालयीन नोंदवहीत घेण्यात आलेल्या नाहीत.

3) पुरवठा चलनावर बॅच क्रमांक नमुद नसल्याने पुरवठादाराने देयेकासोबत सादर केलेला गुणप्रत तपासणी अहवालात दर्शविल्याप्रमाणेच कच्चा कोरडा आहार पुरवठा केल्याबाबतची सत्त्यता लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

4) जननी महिला मंडळ, पुणे यांनी उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे वरील महिन्यातील देयकांवर पावती क्रमांक, चलन क्रमांक तसेच व्हॅट क्रमांक (विक्रीकर) प्रमाणपत्र क्रमांक नमूद केकेला नाही. लेटर पॅडवर देयके सादर केल्याचे दिसून येत आहे. अशी देयके मंजूर कशाच्या आधारे केली? याचा खुलासा केलेला नाही.

**4.639 एकात्मिक बालविकास प्रकल्प म्हसळा अंतर्गत THR पुरवठा केलेबाबत.**

**पंचायत समिती म्हसळा, जिल्हा रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** याबाबत रक्कम रुपये 18**,**54**,**224**/-** खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत..

1) THR आहार पुरवठा केलेबाबतची माहे जुलै 2016 ते मार्च 2017 देयेके तपासली असता पुरवठादार यांनी सादर केलेल्या देयेकातील, अंगणवाडी सेविकांनी कार्यालयाकडे सादर केलेल्या पुरवठा चलनाच्या आधारे कोणत्याही अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली नाहीत व रक्कम अदा केली आहे.

2) अंगणवाडी सेविकांनी सादर केलेल्या पुरवठा चलनाच्या नोंदी कार्यालयीन नोंदवहीत घेण्यात आलेल्या नाहीत.

3) स्टार स्वयंसहायता महिला बचतगट, दिघी यांनी उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे वरील महिन्यातील देयकांवर पावती क्रमांक, चलन क्रमांक तसेच व्हॅट क्रमांक (विक्रीकर) प्रमाणपत्र क्रमांक नमूद केलेला नाही. लेटर पॅडवर देयेके सादर केल्याचे दिसून येत आहे. अशी देयके मंजूर कशाच्या आधारे केली? याचा खुलासा केलेला नाही.

4) विक्रीकर वसुली देयके रु. 92711/- करण्यात आलेली नाही.

**4.640 90 टक्के अनुदानावर सौरकंदील ग्रामीण भागातील महिलांना पुरविणे.**

**पंचायत समिती रत्नागिरी, जिल्हा रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 20) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,77,290/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे सदर लाभार्थ्यांना दुबार लाभ दिला किंवा कसे, याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. त्याबाबत योग्य तो खुलासा करावा व पुर्तता अनुपालन सादर करावे.

2) 10 टक्के लाभार्थी हिस्सा भरणा केलेला नाही. रक्कम रुपये 27,729/- संबधित लाभार्थ्यांकडून वसूल करुन संबधित पुरवठादाराला आदा करावयाचे असतांना तसे करण्यात आले नाही.

3) सौर कंदील पंचायत समितीमध्ये 117 पोहोच झाले आहेत. मात्र त्यापैकी फक्त 28 सौर कंदिलाचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित सौर कंदिलांचे वाटप करुन व 10 टक्के लाभार्थी हिस्सा वसूल करावा.

4) मालाची दर्जाबाबत सदर सौरकंदील आय.एस.आय मार्क असलेबाबत पडताळणी करता आली नाही.

**4.641 ग्रामीण भागातील मुलींना व महीलांना शिलाई मशीन पुरविणे.**

**पंचायत समिती गुहागर, जिल्हा रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,93,750/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) शिलाई मशीन वॉरंटी किती वर्षाची होती, याबाबत पडताळणी करता आली नाही. सदर मशीन वॉरंटी कार्ड उपलब्ध करावे.

2) पुरवठादाराकडुन विक्री पश्चात सेवा देण्याचा करारनामा करण्यात आला नाही.

3) शिलाई मशीनबाबत शासनाचा दरकरार होता किंवा कसे, याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. लाभार्थ्यांना काही समस्या निर्माण झाल्यास त्यांची दुरुस्ती करण्यासाठी विक्री पश्चात सेवा देण्याचा करारनामा करणे आवश्यक असतांना तसे करण्यात आले नाही. शासनाचा दरकरार दर व खुल्या बाजारपेठेत दर याबाबत पडताळणी करता आली नाही.

4) मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे सदर लाभार्थ्यांना दुबार लाभ दिला किंवा कसे, याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

5) डिलीव्हवरी चलन उपल्बध झाले नाही. सदरचे साहित्य विहीत मुदतीत पोहोच झालेबाबत पडताळणी करता आली नाही.

6) 50 पैकी 1 एका शिलाई मशीन वाटप करण्यात आलेले नाही. ते वाटप का करण्यात आले नाही? याबाबत खुलासा करावा.

7) श्रीम.रेश्मा पांडुरुग कावणकर, रा.कोतळुक, श्रीम.नियती दिनेश पवार, रा.कारुळ. या लाभार्थ्यांचे प्रस्ताव लेखापरीक्षणात उपलब्ध झाले नाहीत.

8) शिलाई मशीन आय.एस.आय मार्क असलेबाबत कागदपत्र नस्तीमध्ये उपलब्ध झाले नाहीत.

**4.642 महिलांना व मुलींना शिवणकाम प्रशिक्षण देणे.**

**पंचायत समिती गुहागर, जिल्हा रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 26) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,80,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) दरपत्रके मागविण्याचे सुचनापत्रकामध्ये दरपत्रके अंतिम पोहोच तारीख, दरपत्रके उघडण्याची तारीख, वेळ नमुद नाही. दरपत्रके विहीत मुदतीत पोहोच झाले किंवा कसे, याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही. अंतिम तारीख व दरपत्रके उघडण्याचे तारीख नमुद न करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

2) दरपत्रके मागविण्याचे पाकीटे सीलबंद केलेली नाहीत. पाकिटे सिलबंद का मागविण्यात आली नाही, याबाबत खुलासा करावा.

3) मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे सदर लाभार्थ्यांना दुबार लाभ दिला किंवा कसे, याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

4) दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आलेला नाही. याबाबत खुलासा करावा.

**4.643 पंचायत समिती सेस मधुन ग्रामीण भागातील महिला व मुलीकरिता संगणक प्रशिक्षण (MS-CIT) योजना राबविणे, या योजनेत आढळून आलेल्या अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती निफाड, जिल्हा नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 33) -** एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प, पंचायत समिती, निफाड यांनी सन 2016-2017 या वित्तीय वर्षात 7 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण (MSCIT) योजनेवर रक्कम रुपये 4,97,000/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी निवड करतांना किती लाभार्थ्यांचे अर्ज आलेत व किती बाद झालेत याविषयी माहिती उपलब्ध झालेली नाही.

2) एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प विभागाने मास्टर नोंदवही (लाभार्थी) ठेवलेली नसल्याने लाभार्थी कुटूंबापैकी कोणतीही व्यक्ती अंगणवाडी सेविका, मदतनीस, शासकीय / निमशासकीय कर्मचारी यापैकी नसलेबाबत प्रमाणपत्र घेतलेली नाही.

3) लाभार्थी कुटूंबाने गेल्या 10 वर्षात एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प विभाग अथवा समाजकल्याण विभागाच्या स्वयंरोजगाराच्या वैयक्तिक योजनेचा लाभ घेतला नसल्याचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

4) महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परीषद, नाशिक आदेश क्रमांक म.बा.क./अर्थ/690/11, दिनांक 14/11/2011 नुसार प्रशिक्षणाचा लाभार्थ्यांनी पुरेपूर लाभ घेतल्याची तसेच प्रशिक्षण गुणवत्ता व उपयुक्तता याची खातरजमा केलीबाबतचा अहवाल उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) यांनी पाठविलेला नाही. तसेच बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी प्रशिक्षण वर्गास भेटी दिल्याचे दिसून आले नाही.

5) लाभार्थी तंत्रज्ञान परीक्षेस बसला नाही, तर दिलेल्या लाभाची रक्कम पूर्णपणे परत घ्यावयाची आहे. त्यासंबंधी लाभार्थीकडून रुपये 10/- चे कोर्ट फी स्टँप लावुन हमी पत्र लिहून घेणे आवश्यक असतांना, त्याबाबत कार्यवाही केलेली नाही.

6) कार्यारंभ आदेशातील अट क्रमांक 10 नुसार संगणक प्रशिक्षणासाठी 3 टक्के अपंग लाभार्थ्यांना लाभ देणे बंधनकारक असतांना, तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**4.644 पंचायत समिती सेस अंतर्गत 10 टक्के एकात्मिक बालविकास सेवा योजने अंतर्गत् अंगणवाडीतील मुलांना स्टिल बेंचेस पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती नंदुरबार, जिल्हा नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** एकात्मिक बालविकास सेवा योजनांतर्गत नंदुरबार व रनाळा प्रकल्पातंर्गत अंगणवाडीतील मुलांना स्टिल बेंचेस पुरविणेकरीता रक्कम रूपये 2,83,750/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेड्पीए/2008/प्र.क्र. 446/ वित्त 9 दिनांक 20/06/2008 अन्वये योजना राबविण्याचे वेळापत्रकप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीआर 1088/सीआर-794 दिनांक 26/10/1989 ज्या वर्षात साहित्य खरेदी केले, त्याच वर्षात साहित्य वाटप करणे आवश्यक आहे. परंतु, साठा नोंदवहीवर वाटप दिनांक नोंदविलेला नसल्याने वाटप कधी केले? याची खात्री करता आली नाही.

3) सदर खरेदीच्या प्रमाणकासोबतच्या नंदुरबार प्रकल्पाच्या दोन Delivery challan पैकी 06 बेंचच्या पुरवठा चलनावर एकात्मिक बालविकास प्रकल्प, नंदुरबार यांची दिनांक 15/05/2017 रोजीची दिनांकीत स्वाक्षरी आहे. तसेच 39 नगाच्या दुसऱ्या चलनावर साहित्य कधी प्राप्त झाले? याबाबतची संबंधित जबाबदार अधिकारी / कर्मचाऱ्याची दिनांकीत स्वाक्षरी नसल्याने साहित्य कोणत्या दिनांकास प्राप्त झाले? याची खात्री करता आली नाही. तसेच रनाळा प्रकल्पाच्या साठा नोंदवहीची तपासणी केली असता 50 नग बेंच साहित्य दिनांक 29/05/2017 रोजी म्हणजे विलंबाने प्राप्त झालेले आहे. दिनांक 15/03/2017 च्या पुरवठा आदेशानुसार 20 दिवसांच्या आत म्हणजे दिनांक 05/04/2017 पावेते प्राप्त होणे आवश्यक असतांना प्राप्त न झाल्याने दंडाची कार्यवाही केलेली नाही. तरी संबंधित पुरवठादाराकडुन दंडाची रक्कम वसुल केल्याच्या कार्यवाहीचे अनुपालन दर्शवावे.

4) सदर साहित्याचे गुणवत्ता प्रमाणपत्र लेखापरिक्षण दर्शविलेला नाही.

5) तसेच सदर साहित्य सुस्थितीत प्राप्त झाल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र नोंदविलेले नाही.

6) अंगणवाडींनी साहित्याची नोंद नमुना नंबर 33 मध्ये घेतल्याचे प्रमाणपत्र प्राप्त केलेले नसल्याने साहित्य नोंदविल्याची खात्री करता आली नाही. तरी नोंद घेतल्याची कागदपत्र उपलब्ध करून अनुपालन दर्शवावे.

**4.645 अमृत आहार योजना राबवितांना आढळुन आलेल्या अनियमितता**

**पंचायत समिती नंदुरबार, जिल्हा नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** अमृत आहार योजनेवर रक्कम रूपये 2,20,96,750/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक आविवि/2015/प्र.क्रं.78/कार्यासन-8, दिनांक 18/11/2015 मधील निर्णय क्रमांक 1 नुसार अनुसुचित क्षेत्रातंर्गत अंगणवाडी / मिनी अंगणवाडी कार्यक्षेत्रातील सर्व गरोदर स्त्रिया व माता यांना एक वेळ आहार देण्याची तरतुद आहे. निर्णय क्रमांक 2 नुसार आहाराचा दर्जा व किंमत, पोषक मुल्यं, शासन निर्णयातील परिशिष्ठ ब नुसार व प्रती लाभार्थी चौरस आहार रूपये 25/- एवढा खर्च अनुज्ञेय आहे. परंतु, आहाराबाबतचे व प्रती लाभार्थी प्रदानाचे लेखापरिक्षणास याबाबतचे अभिलेखे उपलब्ध न झाल्याने याबाबतची खात्री करता आली नाही.

2) उपरोक्त शासन निर्णयाचे मार्गदर्शक तत्व क्रमांक 1 नुसार लाभार्थी नोंदीची अंगणवाडीकडील यादी लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

3) अनुक्रमांक 2 नुसार अंगणवाडीकडील नोंद झालेल्या गरोदर स्त्रिया व माताची (लाभार्थी) नोंद प्राथमिक आरोग्यं केंद्रात नोंदीशी पडताळणी अंगणवाडी सेविका / पर्यवेक्षिका व सदर नोंदी योग्य असल्याबाबतचे प्राथमिक केंद्र अधिकारी यांचे प्रमाणपत्र लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

4) ज्या लाभार्थ्यांना डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार" योजने अंतर्गत एक वेळेचा पुर्ण आहार देण्यात येणार आहे, अशा महिलांना एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना घरी घेऊन जाण्यासाठी आहार (THR) देण्याची आवश्यकता राहणार नाही. तरी उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यात आली किंवा नाही, याची लेखापरीक्षणास कागदपत्रे प्राप्त न झाल्याने पडताळणी करता आली नाही.

5) आंगणवाडी मिनी आंगणवाडी नोंदणी झालेली प्रत्येक गरोदर स्त्री व स्तनदा माता यांची पडताळणी संबधित आरोग्य केंद्रात झालेल्या नोंदणीनुसार करण्यात यावी. तरी पंचायत समिती महिला बालकल्याण विभागाने लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवलेली नसल्याने सदर नोंदी योग्य असल्याची पडताळणी करता आली नाही.

6) ग्राम पातळीवरील 4 सदस्यीय आहार समिती एका आंगणवाडी / मिनी आंगणवाडीकरीता एक अशी चार सदस्यीय आहार समिती ग्रामसभेमार्फत नियुक्त करणेबाबत आदेशित असतांना सदर समित्या स्थापन करुनच लाभार्थ्यांना लाभ प्रदान करण्यात आला असल्याचे कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणाला तपासणी कामी उपलब्ध झाले नाही.

7) या योजनेच्या सर्वकष संनियंत्रण व मुल्य मापनासाठी ज्या मार्गदर्शक पध्दती अंमलात आणणे विषयी सुचना करण्यात आल्या आहेत, त्याप्रमाणे कार्यवाही झालेचा अहवाल लेखापरिक्षणास प्राप्त झाला नाही.

**4.646 भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना अंतर्गत योजना टप्पा**-2 **अंतर्गत खर्चातील अनियमितता**.

**पंचायत समिती अक्कलकुवा, जिल्हा नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती, अक्कलकुवा यांचेकडील भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना अंतर्गत योजना टप्पा-2 अंतर्गत रक्कम रूपये 4,35,67,630/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरीलप्रमाणे आहरित केलेली रक्कम संबंधीत अंगणवाडीच्या आहार समितीच्या खात्यावर वर्ग करण्यात आलेली आहे. प्रती लाभार्थी 80 प्रमाणे रक्कम वर्ग करण्यात आलेली आहे. तथापि, सदर रक्कम प्राप्त झालेबतची पोहच प्राप्त करण्यात आलेली नाही. तसेच सदर रकमेचे उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले नाहीत.

2) सदर योजनेचा निधी वेगवेगळया यंत्रणेमार्फत संबंधीत अंगणवाडीच्या समितीस प्राप्त होत आहे. उदा. गटविकास अधिकारी, महिला बालकल्याण जिल्हा परिषद, व महिला बाल विकास अधिकारी यांचे बिडीएस प्रणालीवर प्राप्त होत आहे. त्यामुळे निधीचे नियोजन व लेखे ठेवणेबाबत सुसुत्रता येण्यासाठी योजनेच्या अनुदानाची रक्कम एकाच यंत्रणेमार्फत वर्ग करण्यात यावी. यामुळे लेखे ठेवणे सोईचे होईल. वरीलप्रमाणे निधी प्राप्त होत राहील्यास योजनेत लेख्याअभावी अपहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) पंचायत समितीमार्फत तालुक्यातील सर्व अंगणवाडीस अनुदान बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहे. तथापि, संबंधीत अंगणवाडी यांनी योजनेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे. वेळोवेळी तपासणीसाठी लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तथापि, संबंधीत अंगणवाडीच्या समितीने लेखे ठेवले किंवा कसे, याची खात्री करता आली नाही. याबाबत जिल्हा परिषद स्तरावरुन खात्री करावी व लेखे अद्यावत ठेवण्यात यावेत.

4) अनुदानाची मागणी करतांना अगोदर अंदाजीत लाभार्थी निवड करुन रकमेची मागणी करण्यात येते व त्यानुसार अनुदानही संबंधीत अंगणवाडीस वर्ग करण्यात येते तथापि, प्रत्यक्ष लाभ किती लाभार्थ्यांना देण्यात येतो? याची परिगणना करण्यात आलेली नाही. त्यामुळे मंजुरीप्रमाणे लाभार्थ्यांना लाभ दिला किंवा कसे, याबाबत खात्री करावी.

5) सदर योजनेचा फलनिष्पती अहवाल प्राप्त करण्यात आलेला नाही. जिल्हा स्तरीय समिती मंजूर केलेली यादी अंगणवाडी यांनी या योजनेचा वार्षिक लेखा अहवाल दिनांक 01 मे च्या ग्रामसभेत वाचन केल्याबाबतचा ठराव, योजनेअंतर्गत किती लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला व इंष्टांक पुर्ण झाला आहे, या योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही. सदरचे अभिलेखे उपलब्ध करुन देणेकामी अर्धसमास पत्र क्रमांक 01, दिनांक 08/08/2017, अर्धसमासपत्र क्रमांक 02, दिनांक 28/08/2017, तसेच अर्धसमासपत्र क्रमांक 03, दिनांक 07/09/2017 अन्वये मागणी करण्यात येवूनही उपलब्ध केलेली नाही.

**4.647 भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना अखर्चित अनुदानाबाबत**

**पंचायत समिती चोपडा, जिल्हा जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 48) -** पंचायत समिती, चोपडा -1 व 2 यांनी सन 2016-2017 मध्ये भारत रत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनामध्ये एकात्मिक बालविकास प्रकल्प चोपडा -1 व 2 यांना नमुना नंबर 11 रोखवही नुसार एकूण रक्क्म रुपये 89,15,000/- एवढे अनुदान प्राप्त झालेले असुन दिनांक 31/03/2017 अखेर रुपये 84,22,710/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आविवि/2015/प्र.क्र.78 कार्यासन-8, दिनांक 18/11/2015 मध्ये अनुक्रमांक 4 नुसार दिनांक 01/12/2015 पासुन आहार देण्यात यावा, असे स्पष्ट नमुद असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आविवि/2015/प्र.क्र.78 कार्यासन-8, दिनांक 18/11/2015 मध्ये अनुक्रमांक 7 नुसार परीशिष्ट -ब मध्ये नमुद केलेप्रमाणे प्रती लाभार्थी चौरस आहारावर खर्च करणेत आलेला नाही.

3) वर नमुद केलेल्या प्रयोजनार्थ प्राप्त झालेले अनुदान दिनांक 31/03/2017 अखेर एकूण रूपये 4,92,290/- एवढे अनुदान अखर्चित असुन प्राप्त प्रयोजनार्थ विनियोग करणेत आलेला नसून प्राप्त अनुदान रकमेचा वेळीच विनियोगाअभावी आदिवासी भागातील लाभार्थी गरोदर महिला चौरस आहाराच्या लाभापासून वंचित राहिल्या आहेत.

**4.648 बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या बँक खात्यातील शिल्लक रकमेबाबत.**

**पंचायत समिती वाई, जिल्हा सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** एकात्मिक बालविकास प्रकल्प विभागाने लेखा विभागाकडे सादर केलेल्या काही देयकांच्या रक्कमा बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या नावे धनादेशाने अदा केलेल्या आहेत. अशा धनादेशांच्या रकमा बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या नावे असलेल्या स्टेट

बँक ऑफ इंडिया खाते नंबर 11399696487 मध्ये जमा केल्या जातात व त्यानंतर रक्कम संबंधीतांच्या नावे धनादेश काढून अदा केली जाते. सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात सदर बँक खात्यावरील तपशिल पाहता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 31/03/2017 रोजी धनादेश क्रमांक 129338 रूपये 2,81,177/- ने लेखा विभागाने अंगणवाडी मदतणीस व सेविका यांच्या प्रवासभत्त्यांचा धनादेश दिलेला असून तो सदर बालविकास प्रकल्प अधिकारी बँक खात्यावर दिनांक 16/05/2017 ला जमा आहे. दिनांक 25/07/2017 अखेर सदर अनुदानाची रक्कम संबंधीतांच्या खात्यावर वर्ग केलेबाबतचे तपशिल दिसून येत नाहीत.

2) लेखापरीक्षण दिनांक 31/07/2017 अखेर सदर बँक खात्यावर रूपये 29,29,878.50/- इतकी रक्कम शिल्लक असून यावरुन विभागाने मोठया प्रमाणात देयकांच्या रकमा प्रलंबित ठेवल्याचे व अनुदानाच्या रकमा बीडीएस प्रमाणीव्दारे अनावश्यकपणे आहरीत करुन ठेवल्याचे स्पष्ट होते. सदर बाब गंभीर अनियमितता आहे.

3) विभागाने सदर रकमांबाबत सामान्य रोकड नोंदवही नमुना नंबर 4 न ठेवलेने उपरोक्त रकमा कशाच्या आहेत? याचा बोध होत नाही.

4) तसेच कर्मचारी वेतनासंबंधातील सेवार्थ रोखवही नमुना नंबर 7 अद्यावत नसून दिनांकनिहाय जमा खर्चाच्या रकमांचा ताळमेळ घेतलेला नाही. कार्यालय प्रमुखांच्या स्वाक्षरीसह सदर रोखवही परिपुर्ण/अद्यावत करुन लेखापरीक्षणास साधार पुर्तता होणे आवश्यक आहे. त्यामुळे शासकीय मुंबई वित्तीय नियम 1959 मधील सुचनांचे पालन करण्यात आलेले नाही.

5) पंचायत समिती सदस्यांना दौऱ्यासाठी मंजूरी देतांना फक्त महिला सदस्यांनाच ती मंजूरी असतांना पंचायत समिती, कोरेगांवमध्ये एकूण 7 महिला सदस्य असतांना ट्रॅव्हल एजन्सीला 17 सदस्यांचे पैसे अदा केल्याने 10 सदस्यांची जादा अदा रक्कम रुपये 1,75,470/- वसुल करुन पुर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

**4.649 महिलांना 90 टक्के अनुदानावर फॉल पिको मशीन पुरवठा करणेबाबत**

**पंचायत समिती शिराळा, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** याबाबत रक्कम रूपये 1,00,080/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निवीदा फार्म रक्कम रूपये 300/- वसूल करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

2) वॅटची रक्क्म रक्कम रूपये 5,560/- येत असताना रक्कम रूपये 5,295/- कपात केल्याने रक्कम रूपये 265/- कमी कपात करण्यात आले आहे.

3) 10 टक्के रक्कम दिनांक 14/01/2017 रोजी रूपये 9,035/- भरणा केली आहे. शिल्लक रक्कम रूपये 2,085/- भरणा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नांही.

4) पुरवठा आदेश अट क्रमांक 6 नुसार सदरचे साहित्य वॉरटी /ग्यारंटीकार्ड तसेच पिको फॉल मशीन हाताळणी संबधीचे माहीतीपत्रक देणे बंधनकारक राहील. त्याप्रमाणे केलेले कार्यवाहीचे अभिलेखे सादर होणे आवश्यक आहे.

5) लाभ देण्यात आलेले 2 लाभार्थी यांचे वय हे अनुक्रमे 68 व 72 नमुद केले आहे. हे खरोखरच पिको फॉल मशीन हाताळू शकतात का? तसेच त्यांना योजनेचा लाभ हा विशेष वयापर्यंत देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आली नांही.

6) आशिर्वाद टेक्निकल इन्स्टीट्यूट यांनी प्रशिक्षण दिल्याचे प्रमाणपत्रावर सदर लाभ देण्यात आले आहेत. प्रमाणपत्राची तपासणी केले असता त्यावर अनुक्रमांक नाहीत. शासन प्रमाणपत्र नावाच्या ठिकाणी खाडाखोड करून नाव नमुद केले आहे. मान्यता नोदणी क्रमांक नाही. मुळ प्रमाणपत्र उदाहरण दाखल मागणी केले असता ते लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नांही. शासन मान्यता असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही. सदर संस्था शासन मान्यता असल्याचे निर्दशनास येत नांही.

7) फक्त एकाच संस्थेने प्रशिक्षण दिलेल्या लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे दिसते.

**4.650 अंगणवाडी व मिनी अंगणवाडी कार्यकर्ती,सेविका व मदतनीस यांना साडी (ड्रेस) पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती एटापल्ली, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 33) -** साडी(गणवेश) व बँचेस करिता प्रती साडी रूपये 300/- प्रमाणे दोन साडया व नावाचा टॅग रूपये 25/- असे एकूण रूपये 625/- प्रमाणे एकुण रूपये 2,18,750/- अनुदान प्राप्त झाले असून पर्यवक्षिका यांचे 6 सर्कल निहाय अंगणवाडी केंद्रात, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची संख्या इतकी असून खर्च रूपये 2,16,250/- झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रमाणकाद्वारे असे एकूण सहा बिट/सर्कल मधील अंगणवाडी केंद्रांतील-सेविका व मदतनीस यांना प्रती रूपये 625/- प्रमाणे एकूण रक्कम रूपये 2,16,596/- प्रत्येक अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे बॅंक खात्यांत रक्कम जमा केल्याचे दर्शविले आहे. परंतु, लेखा संहिता 1968 चे नियम-77(2) नुसार रक्कम प्राप्तीच्या पोच पावत्या नाहीत.

2) सदर निधी ज्या बाबीवर खर्च करण्यांसाठी प्राप्त झाला आहे, त्याच बाबीची खरेदी करून तसा खर्च अहवाल आणि उपयोगीता प्रमाणपत्र संबंधित पर्यवक्षिका यांचे स्वाक्षरीसह प्राप्त केल्याचे अभिलेख्यांत आढळले नाही.

3) चार अंगणवाडीची अखर्चीत रक्कम रूपये 2,500/- शासनास परत करण्यांत आलेली नाही.